दै. मराठवाडा

# मतदार नोंदणीसाठी २१ ऑक्टोबर मुदतवाढ

## आतापर्यंत ४ हजार ९४७ अर्ज प्राप्त

नांदेड (प्रतिनिधी) - मतदार यादीचे संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रम दि. १६ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर दरम्यान राबविण्यात आला. यात महापालिका प्रभागनिहाय स्विकृती केंद्रात आतापर्यंत ४ हजार ९४७ अर्ज प्राप्त झाले आहेत. मतदार नोंदणीसाठी २१ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

१ जानेवारी २०१७ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या मतदारांना मतदार म्हणून नाव नोंदणीसाठी विशेष. मोहीम राबविण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले होते. त्यानुसार दि. १६ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०१६ दरम्यान महापालिका प्रभाग निहाय स्विकृती केंद्रात प्राप्त झालेले ४ हजार ९४७ अर्ज पुढील कार्यवाहीसाठी मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडे पाठविण्यात आले आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या दि.१४ ऑक्टोबर २०१६ च्या पत्रान्वये पुर्ननिरीक्षण कार्यक्रमास दि. २१ ऑक्टोबर २०१६ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे. नवीन मतदारांनी आपले नाव नोंदवून मतदानाचा अधिकार मिळवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासन तसेच महापालिकेच्यावतीने करण्यता आले आहे.

दै. सकाळ

# मतदार नोंदणीसाठी २१ ऑक्टोबरपर्यंत मुदत



**नांदेड, ता. १५ (बातमीदार) :** मतदारयादीचा संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रम ता. १६ सप्टेंबर ते ता. १४ ऑक्टोबर दरम्यान राबविण्यात आला. त्यात महापालिका प्रभागनिहाय स्वीकृती केंद्रात आतापर्यंत चार हजार ९४७ अर्ज प्राप्त झाले आहेत. मतदार नोंदणीसाठी ता. २१ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

एक जानेवारी २०१७ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या मतदारांना मतदार म्हणून नाव नोंदणीसाठी विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले होते. त्यानुसार ता. १६ सप्टेंबर ते ता. १४ ऑक्टोबर दरम्यान महापालिका प्रभाग निहाय स्विकृती केंद्रात प्राप्त झालेले चार हजार ९४७ अर्ज पुढील कार्यवाहीसाठी मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार यांच्याकडे पाठविण्यात आले आहेत. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या १४ ऑक्टोबरच्या पत्रान्वये पुर्ननिरीक्षण कार्यक्रमास ता. २१ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. नवीन मतदारांनी आपले नाव नोंदवून मतदानाचा अधिकार मिळवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासन आणि महापालिकेने केले आहे.

दै सत्यप्रभा

# मतदार नोंदणीसाठी २१ ऑक्टोबरपर्यंत मुदत वाढ

नांदेड दि. १५– मतदार यादीचे संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रम दि.१६ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर दरम्यान राबविण्यात आला. यात महापालिका प्रभागनिहाय स्विकृती केंद्रात आतापर्यंत ४ हजार ९४७ अर्ज प्राप्त झाले आहेत. मतदार नोंदणीसाठी २१ ऑक्टोबरपर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे. १ जानेवारी २०१७ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या मतदारांना मतदार म्हणून नाव नोंदणीसाठी विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले होते. निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या दि.१४ ऑक्टोबर २०१६ च्या पत्रान्वये पुर्ननिरीक्षण कार्यक्रमास दि.२१ ऑक्टोबर पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.